जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 FEB 2020

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाला रग्बी स्पर्धेत गोल्ड



कोल्हापूर : खेलो इंडिया आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील विजेत्या शिवाजी विद्यापीठाच्या संघास चषक देवून सन्मानित करण्यात आले.

प्रतिनिधी

कोल्हापूर

भुवनेश्वर (ओडिसा) येथे सुरू असलेल्या पहिल्या खेलो इंडिया स्पर्धेत मुलांच्या वरिष्ठ गट रग्बी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला.

उपांत्य पूर्व फेरीमध्ये शिवाजी युनिव्हर्सिटी संघाने स्थानिक किट युनिव्हर्सिटी संघाचा २४ विरुद्ध ० ने पराभव केला. तर अंतिम सामन्यात चंदिगड संघाचा २४ विरुद्ध १९ ने पराभव करत विजेतेपद पटकाविले. विशेष म्हणजे, या स्पर्धेत विद्यापीठ संघाने शानदार खेळाचे प्रदर्शन साकारले. या जोरावर संघाला जेतेपद पटकावता आले. विजेत्या संघास प्रशिक्षक दीपक पाटील, संघ व्यवस्थापक राहुल लहाने यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

**विजेत्या संघातील खेळाडू :** श्रीधर निगडे, पृथ्वीराज पाटील, विनायक पवार, गोविंद गुप्ता, भरत चव्हाण, सोमनाथ चव्हाण, दिपराज राजेभोसले, ईश्वरराज कोटकर, रोहित मुद्राळे, हर्षद मोरबाळे, ओमकार चौगुले, सौरभ पाटील यांचा समावेश आहे.

# समाजनिर्मितीत विज्ञानाचे योगदान

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर





राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. व्ही. एस. मन्ने, डॉ.डी. टी. शिर्के, आदी.

'विज्ञान हे संशोधनाचे मुख्य प्रवेशद्वार आहे. संशोधन म्हणजे ज्ञान शोधण्याची कला आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागामार्फत राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाच्या सांगता समारंभामध्ये अध्यक्षस्थानावरून

## शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाचा समारोप

कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

कुलगुरू शिंदे म्हणाले, 'समाज घडविण्यामध्ये विज्ञानाचे फार मोठे योगदान आहे विज्ञानातील विवेकपूर्ण विचार हे समाजाला अंधश्रद्धेपासून दूर ठेवण्याचे मुख्य काम करीत असते. प्रत्येक व्यक्तीमध्ये एक संशोधक लपलेला असतो. संशोधक वृत्तीचे कार्य पूर्ण होण्यासाठी त्याला पूरक वातावरण उपलब्ध होणे आवश्यक आहे. संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. संशोधनामुळे माणूस सक्षम बनतो.'

डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'भारतीय महिला शास्त्रज्ञांचे विज्ञानात फार मोठे योगदान आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासू, चिकित्सकवृत्ती जोपासून समाजाच्या प्रगतीसाठी विज्ञानाचा उपयोग करावा'

यावेळी अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थिनी स्वरूपा फडके यांनी मनोगत व्यक्त केले. सप्ताहाच्या माध्यमातून प्राणिशास्त्र विभागामार्फत निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन स्पर्धांचे आयोजन केले होते. प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना कुलगुरूंच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने यांनी स्वागत केले. समन्वयक डॉ. एम. व्ही. वाळवेकर यांनी आढावा सादर केला. आदित्य नागवेकर यांनी सूत्रसंचलन केले. डॉ. माधव भिलावे यांनी आभार मानले. यावेळी अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. अभय जायभाये यांच्यासह शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, संशोधक उपस्थित होते.

प्रिन्स शिवाजीराजे भोसले : स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था 'शिव-जीवनगौरव'ने सन्मानित

# शिवरायांच्या विचारांनी देशसेवा करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** छत्रपती शिवरायांचे विचार घेऊन तरुणाईने देशसेवेसाठी पुढे यावे. त्यांनी देशनिष्ठा बळकट करावी, असे आवाहन तंजावरचे प्रिन्स शिवाजीराजे टी. भोसले यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीतर्फे आयोजित 'शिवमहोत्सवा'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठातील राजमाता जिजाऊ साहेब बहुउद्देशीय सभागृहातील या कार्यक्रमात त्यांच्या हस्ते श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला 'शिव-जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित केले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी पुरस्कार स्वीकारला. मानपत्र, पुस्तक असे पुरस्काराचे स्वरुप होते.

महापौर निलोफर आजरेकर, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, 'शिवमहोत्सवा'चे संकल्पक डॉ. प्रवीण कोडोलीकर, 'मॉर्डन होमिओपॅथी'चे विजयकुमार माने, आदी प्रमुख उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आयोजिलेल्या 'शिवमहोत्सवा'मध्ये प्रिन्स शिवाजीराजे भोसले यांच्या हस्ते 'शिव-जीवनगौरव' पुरस्कार प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी स्वीकारला. यावेळी डावीकडून व्ही. टी. पाटील, डी. आर. मोरे, डी. टी. शिर्के, देवानंद शिंदे, विजयकुमार माने, विलास नांदवडेकर, प्रवीण कोडोलीकर उपस्थित होते.

पी. टी. गायकवाड, अनिल घाटगे, रवींद्र भणगे, शिवाजी कांबळे, सूरज धनवडे, दत्तात्रय कवाळे, शालन मोरे, नंदिनी पाटील, सुनील कोळी यांना 'शिवपुरस्कार', तर सागर अहिवळे, व्हाईट आर्मीचे अशोक रोकडे, प्राचार्य एस. एस. चव्हाण यांना 'शिव अभिमान' आणि राजकुमार ढवळे यांना 'शिवकृषी अभिमान' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अण्णासाहेब खेमनर, सुधर्म वाझे, डी. आर. मोरे, व्ही. टी. पाटील, शीतल माने, मंदार पाटील, मंजित माने, आदी उपस्थित होते. सागर बगाडे यांनी प्रास्ताविक, तर सत्यजित कोसंबी यांनी सूत्रसंचालन केले. ऋतुराज माने यांनी आभार मानले.

## सांस्कृतिक कार्यक्रम रंगला

पुरस्कार वितरणानंतर सांस्कृतिक कार्यक्रम रंगला. त्याची सुरुवात सार्थक भिलारी याच्या शास्त्रीय नृत्याने झाली. पूजा गोटखिंडीकर यांनी 'अधीर मन झाले' गीत सादर केले. श्वास अकॅडमीने 'तान्हाजी'मधील गीतांवरील नृत्याने उपस्थितांना ठेका धरायला लावला. त्यानंतर सँड आर्ट, नृत्यांचे सादरीकरण झाले. त्याला टाळ्या-शिट्ट्यांनी दाद देत तरुणाईने जल्लोष केला.



शिव जीवनगौरव पुरस्कार डॉ.अभयकुमार साळुंखे यांना प्रदान करताना तंजावरचे प्रिन्स शिवाजीराजे टी. भोसले. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी.टी.शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर,गजानन पळसे, डॉ.डी. आर.मोरे, व्ही.टी.पाटील, डॉ. प्रवीण कोडोलीकर आदी.

# शिवमहोत्सवात कलाविष्काराला उधाण

## प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांना शिव -जीवनगौरव पुरस्कार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

गाणी, नृत्य, एकपात्री, नकला अशा एकाहून एक कलाविष्काराने शिव महोत्सवाचा मंच रंगला. नेत्रदीपक रोषणाईने सजलेले शिवाजी विद्यापीठाचे आवार, टाळ्या, शिट्ट्यांनी कलाकारांना देण्यात येणारे प्रोत्साहन, गर्दीने फुलून गेलेले राजमाता जिजाऊ सभागृह आणि विद्यापीठाच्या आजी माजी विद्यार्थ्यांचा सळसळता उत्साह अशा वातावरणात शिव महोत्सवात समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींना तंजावरचे प्रिन्स शिवाजीराजे टी. भोसले यांच्या हस्ते गौरवण्यात आले. याप्रसंगी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांना शिव-जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते.

आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीच्यावतीने शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात शिव-महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना प्रिन्स शिवाजीराजे भोसले म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याचे स्वप्न केवळ पाहिले नाही तर ते सत्यात उतरवण्यासाठी जीवाचे रान केले. रयतेच्या हितासाठी मावळ्यांची फौज उभी केली. प्रजेच्या सुखासाठी शौर्याची बाजी लावली. आजही शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा इतिहास युवकांना प्रेरित करतो.'

पुरस्कार वितरण समारंभानंतर बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम झाला. सार्थक भिलारी याच्या शास्त्रीय नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. गायिका पूजा गोटखिंडीकर यांनी 'अधीर मन झाले' हे मराठी गीत सादर केले. श्वास ॲकॅडमीच्या कलाकारांनी 'तान्हाजी' चित्रपटातील नृत्य सादर केले. बाहुबली राजमाने यांनी विविध कलाकारांची मिमिक्री मनोरंजक ठरली. शिवम मगदूम यांनी 'जोगवा' नृत्य, श्रावणी महाजन यांनी 'ये मेरा दिल' हे गीत सादर केले. माधुरी पवार यांनी 'अप्सरा आली' ही लावणी सादर करीत उपस्थितांना ठेका धरायला लावला. स.म.लोहिया हायस्कूलच्या विश्व विक्रमी 'पंच दैवत' या नृत्याने उपस्थितांनी मने जिंकली. अमित माळकरी यांनी सँड आर्ट सादर केली. नृत्य दिग्दर्शक सागर बगाडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सत्यजित कोसंबी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी.टी.शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, संयोजक डॉ. प्रवीण कोडोलीकर, प्राचार्य आण्णासाहेब खेमनार, डॉ. विजयकुमार माने, सुधर्म वाझे, आदी उपस्थित होते.

### पुरस्काराचे मानकरी

- शिव पुरस्कार- डॉ. पी.टी. गायकवाड, अनिल घाटगे, डॉ. रवींद्र भणगे, प्रा.डॉ. शिवाजीराव कांबळे, सूरज धनवडे, दत्तात्रत कवाळे, कृष्णात पवार, शालन मोरे, नंदिनी पाटील, सुनिल कोळी.
- शिव अभिमान पुरस्कार- सागर अहिवळे, माधुरी पवार, श्रावणी महाजन.
- शिव सन्मान पुरस्कार- अवधूत भोसले, वेदवंती भोसले, महेश सोनुले.
- शिव कृषी अभिमान पुरस्कार - राजकुमार ढवळे

# शिवाजी महाराजांचे विचार जोपासण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत

## प्रिन्स शिवाजीराजे टी. भोसले; शिव पुरस्कार वितरण समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याचे स्वप्न पाहिले व ते सत्यात उतरविले. प्रत्येक जण शिकून डॉक्टर, इंजिनिअर होण्यासाठी प्रयत्न करीत आहे. देशाची सेवा करण्यासाठी तरुणांनी योगदान द्यावे. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार जोपासण्यासाठी विद्यार्थांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन तंजावरचे प्रिन्स शिवाजीराजे टी. भोसले यांनी केले.

आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीच्या वतीने आयोजित शिव महोत्सवांतर्गत पुरस्कार वितरणप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. प्रिन्स शिवाजीराजे भोसले म्हणाले, स्वराज्य मराठ्यांच्या रक्तात आहे. भगवा झेंडा फडकावण्यासाठी युवकांनी, तरुणांनी पुढे यावे.


यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा शिव-जीवनगौरव पुरस्कार संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांना प्रदान करण्यात आला.

पुरस्कार वितरण समारंभानंतर बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम झाला. सार्थक भिलारी याच्या शास्त्रीय नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. गायिका पूजा गोटखिंडीकर यांनी 'अधीर मन झाले' हे मराठी गीत सादर केले. श्वास ॲकॅडमीच्या कलाकारांनी 'तान्हाजी' चित्रपटातील नृत्य सादर केले. माधुरी पवार यांनी 'अप्सरा आली' ही लावणी सादर करीत उपस्थितांना ठेका धरायला लावला. नृत्यदिग्दर्शक सागर बगाडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सत्यजित कोसंबी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी महापौर निलोफर आजरेकर, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, गजानन पळसे, डॉ. डी. आर. मोरे, व्ही. टी.पाटील, डॉ. प्रवीण कोडोलीकर आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांना शिव-जीवनगौरव पुरस्कार प्रदान करताना तंजावरचे प्रिन्स शिवाजीराजे टी. भोसले, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. प्रवीण कोडोलीकर आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

यावेळी शिव महोत्सवात विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. शिव पुरस्कार - डॉ. पी. टी. गायकवाड, अनिल घाटगे, डॉ. रवींद्र भणगे, प्रा.डॉ. शिवाजीराव कांबळे, सूरज धनवडे, दत्तात्रत कवाळे, कृष्णात पवार, शालन मोरे, नंदिनी पाटील, सुनील कोळी. शिव अभिमान पुरस्कार - सागर अहिवळे, राजारामपुरी पोलिस ठाणे, व्हाईट आर्मी, स. म. लोहिया हायस्कूल, माधुरी पवार, श्रावणी महाजन. शिव सन्मान पुरस्कार - अवधूत भोसले, वेदवंती भोसले, महेश सोनुले. शिव कृषी अभिमान पुरस्कार - राजकुमार ढवळे यांना प्रदान करण्यात आले.







कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजी-माजी विद्यार्थी संघातर्फे शुक्रवारी झालेल्या शिव महोत्सवातील नृत्य छटा. दुसऱ्या छायाचित्रात आजी-माजी विद्यार्थी संघातर्फे शुक्रवारी घेण्यात आलेल्या शिव महोत्सवात विवेकानंद शिक्षण संस्थेला शिव जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी प्रिन्स शिवाजीराजे भोसले यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना संस्थेचे सचिव माजी प्राचार्य अभयकुमार साळुंखे. शेजारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डी. आर. मोरे, डॉ. विलास नांदवडेकर, अजितकुमार माने, डॉ. प्रवीण कोडोलीकर आदी.

# शिवरायांचे विचार देशसेवेसाठी वापरा

## प्रिन्स शिवाजीराजे भोसले; सांस्कृतिक कार्यक्रमांनी उजळला शिव महोत्सव

**कोल्हापूर, ता. २७ :** ''छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वापर देशसेवेसाठी करावा. त्यातून देशावरील निष्ठेचा झेंडा डौलाने फडकवत ठेवा, असा संदेश तंजावरचे प्रिन्स शिवाजीराजे भोसले यांनी आज येथे दिला. शिवाजी विद्यापीठाच्या आजी-माजी विद्यार्थी संघातर्फे भरलेल्या शिव महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते शिव महोत्सवाचे उद्घाटन झाले. मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम केलेल्या व्यक्तींचे सत्कार झाले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे माजी प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांना 'शिव जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यानंतर रंगीबेरंगी विद्युत रोषणाई व संगीतांच्या तालावर सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरवात झाली. नृत्यकलावंत सार्थक भिलारे यांच्या भरत नाट्यमद्वारे वंदन केले. गायिका पूजा गोटखिंडीकर यांनी 'अधीर मन माझे' ही सुरेल गीत सादर केले. यानंतर 'तान्हाजी' चित्रपटातील सामुदायिक नृत्य अदाकारांने तर टाळ्या, शिट्ट्या, वसूल करीत कार्यक्रमांची उंची वाढली. श्वास अॅकेडमीचे कलावंत सहभागी झाले यात ओंकार शेटे यांनी दिग्दर्शन केले.

पाठोपाठ नृत्यदिग्दर्शक सागर बगाडे दिग्दर्शित 'पंच दैवत' हे विश्वविक्रमी



नृत्य स. म. लोहिया हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी सादर केले. श्रावणी महाजन यांनी केलेल्याही 'पोळी साजूक तुपातील' या लोकगीतांला उपस्थितांनीही नृत्याचा फेर धरला तसा संगीत नृत्याचा हा कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उपकुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. अण्णासाहेब खेमणार, डॉ. अशोक उबाळे, डॉ. विजयकुमार माने आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. प्रवीण कोडोलीकर व मंजीत माने आदींनी संयोजन केले. सत्यजीत कोसंबी यांनी सूत्रसंचालन केले.

**पुरस्कारार्थी असे :**

शिव अभिमान पुरस्कार : सागर अहिवळे, व्हाईट आर्मीचे अशोक रोकडे, स. म. लोहिया हायस्कूल व माधुरी पवार.

शिव-कृषी पुरस्कार : राजकुमार ढवळे, शिवसन्मान पुरस्कार : अवधूत भोसले, वेदवंती व महेश सोनुले यांना दिला.

# विद्यापीठाच्या तलवारबाजी संघाचे यश

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या तलवारबाजी संघाने भुवनेश्वर (ओडिशा) येथे झालेल्या विद्यापीठस्तरीय खेलो इंडिया स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळवला. या संघातील खेळाडूंनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली.

'विद्यापीठाच्या खेळाडूंमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक कमाविण्याची पूर्ण क्षमता आहे. या खेळाडूंनी खेलो इंडिया स्पर्धेतील पहिले पदक मिळवून देदीप्यमान यश मिळवले आहे,' असे कौतुकोद्गार कुलगुरू शिंदे यांनी काढले.

क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी.गायकवाड, डॉ.अनिल कुराडे उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचे प्रोत्साहन लाभले. डॉ. राहूल मगदूम, संघ व्यवस्थापक डॉ. महेश पाटील यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले.

संघातील खेळाडू - आदित्य अनगळ (सेबर वैयक्तिक सुवर्णपदक, सेबर सांघिक रौप्यपदक), विपुल येडेकर (फॉइल वैयक्तिक ब्राँझ पदक, फॉइल सांघिक ब्राँझ पदक), प्रथमकुमार शिंदे (इप्पी सांघिक रौप्यपदक, फॉइल सांघिक ब्राँझ पदक), धनंजय जाधव (सेबर सांघिक रौप्यपदक), गिरीश जकाते (इप्पी सांघिक रौप्य, फॉइल सांघिक ), प्रतीक जाधव (सेबर सांघिक रौप्यपदक), श्रेयस तांबवेकर (इप्पी सांघिक व फॉइल सांघिक रौप्य व ब्राँझ), मोरेश्वर पाटील (इप्पी सांघिक रौप्यपदक), गजराज डोके (इप्पी सांघिक रौप्यपदक), प्रसाद सणस (सेबर सांघिक रौप्यपदक)



शिवाजी विद्यापीठाच्या तलवारबाजी संघाचे कौतुक करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि इतर.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या फे.न्सिंग खेळाडूंबरोबर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

# शिवाजी विद्यापीठाच्या फेन्सिंग संघाचे यश

कोल्हापूर, ता. २८: शिवाजी विद्यापीठाच्या फेन्सिंग खेळाडूंनी खेलो इंडिया स्पर्धेतील पहिले पदक मिळविले,''असे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले. भुवनेश्वर (ओरिसा) येथे झालेल्या पहिल्या खेलो इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या फेन्सींग संघाने तृतीय क्रमांकांचे विजेतेपद पटकावले. या संघातील खेळाडूंनी कुलगुरू डॉ. शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली. क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. अनिल कुराडे उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचे खेळाडूंना प्रोत्साहन लाभले. प्रशिक्षक डॉ. राहुल मगदूम, संघ व्यवस्थापक डॉ. महेश पाटील यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. सांघिक गटातील सर्वसामान्य तृतीय क्रमांकाचे विजेतेपद पटकावलेले यशस्वी खेळाडू आदित्य अनघळ (सेबर वैयक्तीक सुवर्णपदक, सेबर टिम इव्हेंट रौप्यपदक), विपुल येडेकर (फॉइल वैयक्तीक कास्यपदक, फॉइल टिम इव्हेंट कास्यपदक), प्रथमकुमार शिंदे (इप्पी टिम इव्हेंट रौप्यपदक, फॉइल टिम इव्हेंट कास्यपदक), धनंजय जाधव (सेबर टिम इव्हेंट रौप्यपदक), गिरीश जकाते (इप्पी टिम इव्हेंट रौप्यपदक, फॉइल टिम इव्हेंट कास्यपदक), प्रतिक जाधव (सेबर टिम इव्हेंट रौप्यपदक), श्रेयस तांबवेकर (इप्पी टिम व फॉइल टिम रौप्य व कास्यपदक), मोरेश्वर पाटील (इप्पी टिम इव्हेंट रौप्यपदक), गजराज डोके (इप्पी टिम इव्हेंट रौप्यपदक), प्रसाद सनस (सेबर टिम इव्हेंट रौप्यपदक).

# राष्ट्रीय विज्ञान दिन : शिवाजी विद्यापीठात प्रदर्शन रंगले

# ‘नॅनोमटेरिअल’च्या उपयोगाची मिळाली माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नॅनोमटेरिअलचे मानवी जीवनातील विविध उपयोग,सौरऊर्जा आणि इंधननिर्मितीबाबतची माहिती शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी विद्यार्थ्यांना मिळाली. निमित्त होते प्राणिशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय विज्ञानदिनानिमित्त आयोजित प्रकल्प व भित्तिपत्रकांचे प्रदर्शन. ‘वैज्ञानिक क्षेत्रातील सप्ताह’ ही संकल्पना घेऊन ‘राष्ट्रीय विज्ञान सप्ताह’ साजरा केला.

विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स विभागातील या प्रदर्शनाचे उद्घाटन अधिष्ठाता प्रा. डॉ. पी. एस. पाटील आणि डॉ. पी. डी. राऊत यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राणिशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. व्ही. एस. मन्रे, समन्वयक एम. व्ही. वाळवेकर, किरण पवार,आदी उपस्थित होते. विविध अभ्यासक्रमांमध्ये संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात सहभाग घेत सौरऊर्जा निर्मितीसाठी लागणारे नॅनोमटेरिअल, वनस्पतींच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण, इंधननिर्मिती, आदींबाबतचे १० प्रकल्प आणि ६० भित्तिपत्रके सादर केली.



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आयोजित प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध संशोधन प्रकल्प सादर केले.

## ‘विज्ञानफेरी’तून जनजागृती

दरम्यान, या प्रदर्शनाच्या उद्घाटनापूर्वी प्राणिशास्त्र अधिविभागाच्यावतीने दसरा चौक ते शिवाजी विद्यापीठापर्यंत विज्ञानफेरी काढली. त्यात विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. त्यांनी ‘जागतिक तापमानवाढीचे पृथ्वीवरील परिणाम’ या विषयावर ‘जंगलाचे संवर्धन करू, पृथ्वीचेही रक्षण होईल’, ‘विज्ञान की भाषा तरखकी की नई परिभाषा’ असे संदेश फलक आणि घोषणांच्या माध्यमातून जनजागृती केली.

# शिवाजी जाधव समन्वयकपदी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातील



सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांची डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या समन्वयकपदी नियुक्ती केली. विद्यापीठात २०१७ पासून हे अध्यासन सुरू आहे. अध्यासनात अध्यापन आणि संशोधनाचे काम करण्यात येते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी या अध्यासनाची जबाबदारी डॉ. जाधव यांच्याकडे सोपविली आहे; त्यासाठी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदींचे मार्गदर्शन लाभले. जाधव हे सध्या नेतृत्व विकास केंद्राचे समन्वयक म्हणूनदेखील काम पाहत आहेत.

29 FEB 2020

तरुण भारत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणांनी देशसेवेला प्राधान्य द्यावे

## तंजावरचे प्रिन्स शिवाजीराजे भोसले यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात शिव महोत्सवाचे दिमाखदार उद्‌घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराज यांनी सोळाव्या वर्षातच स्वराज्य स्थापन करण्याचे स्वप्न पाहिले व ते सत्यात उतरविले. प्रत्येक विद्यार्थ्याने डॉक्टर, जवान,इंजिनिअर,वकील,शिक्षक अशा अनेक व्यवसायात यशस्वी होऊन देशाची सेवा करण्यासाठी तरुणांनी योगदान द्यावे. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार मोठे करण्यासाठी विद्यार्थांनी प्रामाणिक प्रयत्न करावे, असे आवाहनही तंजावरचे प्रिन्स शिवाजीराजे टी. भोसले यांनी केले.

आजी–माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीच्यावतीने शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ सभागृहात शिव महोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. याप्रसंगी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा शिव–जीवनगौरव पुरस्कार संस्थेचे कार्यकारी





**कोल्हापूर : शिव महोत्सवामध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा शिव–जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी तंजावरचे प्रिन्स शिवाजीराजे भोसले, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्रा. अभयकुमार साळुंखे आदि. दुसऱ्या छायाचित्रात शिव महोत्सवामध्ये श्वास ॲकॅडमीच्या कलाकारांनी 'तान्हाजी'या हिंदी चित्रपटातील गाण्यावर बहारदार नृत्य सादर केले.**

अध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांना प्रदान केला. यावेळी महापौर निलोफर आजरेकर, प्र–कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, डॉ. डी. आर. मोरे, व्ही. टी. पाटील प्रमुख उपस्थित होते. पुरस्कार वितरण समारंभानंतर बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम झाला. राष्ट्रीय विजेता सार्थक भिलारी यांच्या शास्त्रीय नृत्याने कार्यक्रमाची शानदार सुरुवात झाली. गायिका पूजा गोटखिंडीकर यांनी 'अधीर मन झाले' हे मराठी गीत सादर करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. श्वास ॲकॅडमीच्या कलाकारांनी 'तान्हाजी' चित्रपटातील नृत्य सादर केले. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी' च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. बाहुबली राजमाने यांनी मिमिक्री सादर केले. शिवम मगदूम यांनी 'जोगवा' नृत्य, श्रावणी महाजन यांनी 'ये मेरा दिल' हे गीत सादर केले. माधुरी पवार यांनी 'अप्सरा आली' ही लावणी सादर करीत उपस्थितांना ठेका धरायला लावला. स.म.लोहिया हायस्कूलच्या 'पंच दैवत' नृत्याने उपस्थितांनी मने जिंकली. अमित माळकरी यांनी सँड आर्ट सादर केली. सागर बगाडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सत्यजित कोसंबी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. प्रवीण कोडोलीकर, प्राचार्य आण्णासाहेब खेमनार, डॉ. विजयकुमार माने, सुधर्म वझे, शीतल माने, मंदार पाटील, मंजित माने आदी उपस्थित होते.

### यांचा झाला सन्मान ...

शिव–महोत्सव विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. **शिव पुरस्कार:** डॉ. पी.टी.गायकवाड, अनिल घाटगे, डॉ. रवींद्र भणगे, प्रा.डॉ. शिवाजीरा कांबळे, सूरज धनवडे, दत्तात्रत कवाळे, कृष्णात पवार, शालन मोरे, नंदिनी पाटील, सुनिल कोळी. **शिव अभिमान पुरस्कार:** सागर अहिवळे, राजारामपुरी पोलिस ठाणे, व्हाईट आर्मी, स.म.लोहिया हायस्कूल, माधुरी पवार, श्रावणी महाजन. **शिव सन्मान पुरस्कार:** अवधूत भोसले, वेदवंती भोसले, महेश सोनुले. शिव **कृषी अभिमान पुरस्कार :** राजकुमार ढवळे.

# मंत्री उदय सामंत आज दौऱ्यावर

कोल्हापूर : उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत हे आज, शनिवारी जिल्हा दौऱ्यावर येत असून ते विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत.

सकाळी ११.४० वाजता खासगी विमानाने विमानतळ येथे आगमन व शिवाजी विद्यापीठाकडे प्रयाण होईल. दुपारी १२ वाजता स्कूल ऑफ नॅनो सायन्स, शिवाजी विद्यापीठ येथे आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी १.४५ वाजता पालकमंत्री सतेज पाटील यांच्या निवासस्थानी भेट, दुपारी ३ वाजता डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज पदवीदान समारंभ उपस्थिती, सायं ६ वाजता शिवराज विद्यालय, गडहिंग्लज पदवीदानास उपस्थिती.



# शिवाजी विद्यापीठाचे यश

कोल्हापूर : ओडिसा भुवनेश्वर येथे सुरू असलेल्या पहिल्या वरिष्ठ गट खेलो इंडिया मुलांच्या रग्बी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. शिवाजी विद्यापीठ संघाने अंतिम सामन्यात सी. यु. मोहली चंदिगड या संघाचा २४-१९ ने पराभव केला. तर उपांत्य फेरीत स्थानिक किट विद्यापीठ संघाचा २४-० ट्रायने पराभव केला विजयी संघातील खेळाडू: श्रीधर निगडे, पृथ्वीराज पाटील, विनायक पवार, गोविंद गुप्ता, भरत चव्हाण, सोमनाथ चव्हाण, दिपराज राजेभोसले, ईश्वरराज कोटकर, रोहित मुद्राळे, हर्षद मोरबाळे ,ओमकार चौगुले, सौरभ पाटील, प्रशिक्षक : दीपक पाटील, संघ व्यवस्थापक : राहुल लहाने

# शिवाजी विद्यापीठात आज आढावा बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात शनिवारी आढावा बैठक आयोजित केली आहे. पालकमंत्री सतेज पाटील, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत दुपारी बारा वाजता स्कूल ऑफ नॅनो सायन्स येथे ही बैठक होणार आहे. पालकमंत्री, उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांसह ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकरही शनिवारी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

शिवाजी विद्यापीठात दुपारी आढावा बैठक झाल्यानंतर पालकमंत्री आणि उच्च व तंत्र शिक्षणमंत्री प्राचार्य व संस्था चालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहेत. दुपारी साडेबारा वाजता शाहू सिनेट सभागृहात ही चर्चा होणार आहे. यानंतर ते शिवाजी युनिव्हर्सिटी टीचर असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांशीही चर्चा करणार आहेत.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री सामंत यानंतर न्यू पॉलिटेक्निलला भेट देणार आहेत. दुपारी तीन वाजता ते डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या पदवीदान समारंभास उपस्थित राहणार आहेत. यानंतर ते गडहिंग्लजला रवाना होणार आहेत.

# शिवाजी विद्यापीठास सुवर्णपदक

**कोल्हापूर, ता. २८ :** भुवनेश्वर, ओडिशा येथे सुरू असलेल्या पहिल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये अटीतटीच्या अंतिम सामन्यात शिवाजी विद्यापीठ मुलांच्या संघाने चंडीगड युनिव्हर्सिटी, मोहालीचा पराभव करीत सुवर्णपदक पटकावले.

ऑलिम्पिक पात्रता असणाऱ्या रग्बी खेळात कोल्हापूर संघाने आपला दबदबा राखत पहिल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये जेतेपदाला गवसणी घातली. शिवाजी विद्यापीठ संघाने के.आय.आय.टी.विद्यापीठ भुवनेश्वर संघाचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

या सामन्यात २४- ० ट्रायने विजय मिळवला. स्पर्धेचा अंतिम सामना चंदीगड युनिव्हर्सिटी, मोहाली या संघासोबत झाला. अटीतटीच्या आणि रोमहर्षक ठरलेल्या या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने विजय मिळाला. १९ ट्रायची आघाडी असणाऱ्या शिवाजी विद्यापीठ संघावर मोहाली संघाने दबाव आणला.




**मोहाली : खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये सुवर्णपदकप्राप्त शिवाजी विद्यापीठाच्या संघासह प्रशिक्षक व मार्गदर्शक.**

पाच ट्रायवरून मुसंडी मारत १९ ट्रायपर्यंत मोहाली संघाने मजल मारली. अखेरच्या काही वेळेत शिवाजी विद्यापीठ संघाने जोरदार आणि जिगरबाज खेळ करत मोक्याच्या क्षणी पाच ट्रायची कमाई केली. यामुळे संघाचा अंतिम गुणफलक २४- १९ असा राहिला. शिवाजी विद्यापीठाच्या विजयी संघामध्ये श्रीधर निगडे, पृथ्वीराज पाटील, विनायक पवार, गोविंद गुप्ता, भरत चव्हाण, सोमनाथ चव्हाण, दिपराज राजेभोसले, ईश्वरराज कोटकर, रोहित मुद्राळे, हर्षद मोरबाळे ,ओमकार चौगुले, सौरभ पाटील यांचा समावेश आहे. प्रशिक्षक म्हणून दीपक पाटील यांनी तर संघ व्यवस्थापक म्हणूनराहुल लहाने यांनी काम पहिले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागातातर्फे रेशीमबाबत माहिती देताना प्रमुख उपस्थित.

# रेशीम शेतीचे ९० शेतकऱ्यांना प्रशिक्षण

## शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागातातर्फे उपक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : यवतमाळ जिल्ह्यातील ९० निवडक शेतकरी शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागात आले होते. जिल्हा रेशीम कार्यालय, रेशीम संचालनालयामार्फत या शेतकऱ्यांची निवड केली होती.

जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ यांच्या अर्थसाह्याने जिल्हा रेशीम अधिकारी पंडित चौगले यांचे मार्गदर्शनाखाली गणेश झलक यांचे नेतृत्वाखाली शेतकरी रेशीमशास्त्र विशेष प्रशिक्षणासाठी उपस्थित होते. विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने आणि रेशीमशास्त्र इन्क्युबेशन केंद्र समन्वयक डॉ. ए. डी. जाधव यांच्या प्रयत्नाने राज्यभर शेतीला विद्यापिठात प्रशिक्षण दिले जाते.

डॉ. जाधव यांनी तुती लागवड, किटक संगोपन धागा निर्मिती, मुल्यवर्धीत आदीवर मार्गदर्शन केले. डॉ. मन्ने यांनी रेशीम अळ्यांचे रोग, किड व्यवस्थापण बाबत माहिती दिली. डॉ. एस. आर. यंकची यांनी 'एक झाड, एक अंडिपुंज' बाबत संवाद साधला. त्यानंतर शेतकऱ्यांना एमआयडीसी कागल येथील साई गोकुळ येथे तुती पाने कापणी तसेच कोश काढणी मशीनचे प्रात्यक्षिक दाखविले. तसेच यळगुड रेशीम ग्रामला भेट दिली. तेथील प्रगतशील रेशीम शेतकरी अप्पासो झुंजार, राजेंद्र बागल, शिवाजी जगताप आदींनी भेटीचे नियोजन केले.